N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** धारणी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0507 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/09/2022 04:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्हाची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 29/09/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनाक पर्यंत):** 29/09/2022

**Time From (वेळेपासून):** 16:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/09/2022 **Time (वेळ):** 03:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/09/2022 03:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शिक्षक कॉलनी धारणी,धारणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**

(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) Name (नाव): श्री नवलकिशोर लक्ष्मण प्रजापती

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1972

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्रभाग 6 धारणी मोनं 86690840,धारणी,धारणी,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्रभाग 6 धारणी मोनं 86690840,धारणी,धारणी,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कु.शुभांगी बाळकृष्ण कोकाटे | | | 1. 101,गजानन रेसिडेन्सी क्र2 धारणी,ग्रामसेवक ग्रा पं बोबदो, धारणी,धारणी,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ. सविता हरि धांडे | | | 1. सरपंच ग्रा म बोबदो , ता धारणी ,धारणी,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

चौकशी अंती

Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 40 हजार रु | 40,000.00 |

0 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

40,000.00

1. Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

2. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

मी वरील प्रमाणे असुन मी दिनांक 12/09/2022 रोजी मा. पोलीस उपअधिक्षक ला.प्र.वि.अमरावती घटक प्रमुख यांना फोन करुन सांगितले की, माझी एका लोक सेवकाविरुध्द तक्रार असुन मी धारणी येथून अमरावती येथे येवुन शकत नाही तरी आपण पुढील कार्यवाही करीता आपला स्टॉफ धारणी पाठविण्याबाबत विनंती केली. त्यावरुन दिनांक 13/09/2022 रोजी पो.नि.प्रविणकुमार पाटील पंच व अमरावती ला.प्र.वि.चा स्टॉफ धारणी येथे आले. तेव्हा त्यांनी मला मोबाईल फोन करुन मला धारणी रोड वरील बाल हनुमान मंदीर येथे बोलावुन घेतल्याने मी माझ्या दु चाकी वाहनासह तेथे आलो तेव्हा पो.नि.प्रविणकुमार पाटील यांनी पंचासमक्ष माझे नाव गाव विचारुन लोकसेवका विरुध्द असलेल्या तक्रार संबधाने विचारपुस केली असता मी त्यांना सांगितले की, मी श्री धर्मेद्र रमेशचंद्र राठोड रा धारणी यांचे कडे त्यांच्या शासकीय कंत्राट कामावर सुपर व्हायजर म्हणुन काम करतो.त्याची सर्वी कामे जसे आर्थीक व्यवहार साहीत्य खरेदी करणे तसेच शासकीय कार्यालयातील कागदोपत्री व्यवहारासंबंधी सगळे काम मी करतो. श्री धर्मेद्र रमेशचंद्र राठोड ग्राम पंचायत बोबदो अंतर्गत रोहीणी खेडा येथे शौचालय दुरुस्तीचे काम निवीदा नुसार मंजुर झाले होते. सदर काम श्री राठोड यांच्या आदेशानुसार मी दिनांक 25/02/2020 ला शौचालय दुरुस्ती चे काम सुरु करुन दिनांक 25/02/2020 ला काम पुर्ण केले. सदर कामाचे देयकाची ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांच्या कडे मागणी केली असता त्यांनी मला 1,49,000रुपयातुन फक्त 30,000 रु चा चेक दिला.व त्यानंतर 60,000 रु चा चेक दिला होता परंतु मागील दोन वर्षापासुन मला माझे उर्वरीत देयक देण्यासाठी ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम व सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांना वारंवार भेटलो असता ते आजपावेतो माल चेक देण्याचे टाळत आहेत. त्यामुळे मी काही दिवसाअगोदर माझ्या कामाच्या उर्वरीत चेक संदर्भात श्रीमती कोकाटे मॅडम यांना भेटलो असता त्यांनी मला तुमचा चेक हा माझ्या व सरपंच मॅडम यांच्या सहीने दयावा लागेल त्याकरीता तुम्ही मला 25,000 रु व सरपंच मॅडम यांचे साठी 25,000रु अशी एकुण 50,000रु दया आम्ही तुमचा चेक लगेच मंजुर करतो. असे सांगितले असता मी त्यांना मॅडम सध्या माझ्या जवळ एवढे पैसे नाही असे सांगितले असता त्यांनी मला तुला चेक पाहीजे असेल तर पैसे घेवुन ये नाहीतर अजुन काही दिवस वाट पहा असे सांगितले त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने होकार देवुन तेथुन परत आलो.मला ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम व सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही परंतु मी त्यांना पैसे नाही दिले तर ते माझा चेक काढणार नाही या भितीने मी त्यांना नाईलाजास्तव होकार दिलेला आहे.माझा ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम व सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांचेशी कुठल्याही प्रकारचा आर्थीक व्यवहार नाही तसेच कुठलेही भांडण नाही तर त्यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी. अशा आशयाची तोंडी तक्रार सांगितली. व त्याच वेळी लेखी तक्रार लिहुन दिली त्यावर पंच क्र.1 राजु धारकर, यांनी शेरा लिहुन पंचांनी त्या तक्रारीवर सहया केल्यात व समक्ष म्हणुन पोनि पाटील यांनी सुध्दा सही केली.

त्यानंतर पोनि पाटील यांनी सांगितले की, ग्रा.पं.बोबदो अंतर्गत रोहणीखेडा येथे शौचालय दुरुस्तीचे कामाचे उर्वरीत बिलाचे देयक मिळणेकरीता ग्रामसेवक श्रीमती कोकाटे व सरपंच श्रीमती धांडे या मला खरोखरच लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे याची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगुन स्टॉफ शैलेश कडु यांना दोन्ही पंचास व मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बद्दल माहीती व कार्यपध्दती समजावुन सांगुन प्रात्यक्षीक करुन दाखविले.त्यानंतर पोनि पाटील साहेब यांनी माल ग्रामसेवक श्रीमती कोकाटे व सरपंच श्रीमती धांडे यांची भेट कशी होणार याबाबत विचारणा केली असता मी त्यांना ग्रामसेवक श्रीमती कोकाटे हया सध्या त्यांच्या खाजगी कार्यालयात हजर असतील

असे सांगितल्याने ग्रामसेवक श्रीमती कोकाटे यांची भेट घेण्याकरीता मला पाठवुन पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर लगेच स्टाफ शैलेश कडु यांनी माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन मला व पंच क्र. 1 श्री. राजु धारकर यांना माझ्या मोटरसायकलने ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांची भेट घेण्यासाठी त्यांचे खाजगी कार्यालयात पाठविले तेव्हा माझी व ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांची भेट झाली भेटीदरम्यान श्रीमती कोकाटे मॅडम यांनी मला माझे ग्रा.प.बोबदो अंतर्गत रोहणीखेडा येथे केलेल्या शौचालय दुरुस्तीचे कामाचे बिल देयकाचा चेक देण्याकरीता स्वताकरीता 20,000रु ची मागणी करुन सदर लाचेची रक्कम चेकबुक आल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले व सरपंच श्रीमती धांडे यांचेशी तक्रारदार यांना भेटुन घेण्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले. परंतु ग्रामपंचायत बोबदो येथील सरपंच श्रीमती धांडे यांची भेट न झाल्याने मी सांगेल त्या दिवशी ग्रामपंचायत बोबदो येथील सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आपण मला सुचना देवुन ला.प्र.वि.अमरावती येथे निघुन गेलात.त्यानतर दिनाक 19/09/2022 रोजी पोनि पाटील साहेब यांनी मला फोन करुन ते महत्वाच्या कामानिमित्त बाहेरगावी जात असल्याचे सांगुन पुढील तपास श्री. योगेशकुमार दंदे हे करणार असल्याचे सांगितले व त्यांचा मोबाईल क्रमांक मला देवुन पुढील कारवाई करणे कामी त्यांचेशी संपर्क करण्याचे सांगीतले. त्यावरुन मी दिनांक 27/09/2022 रोजी पोनी दंदे साहेब यांना फोन करुन दिनांक 28/09/2022 रोजी सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांची भेट घेणार असल्याचे सांगितले त्यावरुन दिनांक 28/09/2022 रोजी सकाळी अंदाजे 11.30 वा च्या सुमारास पोनी दंदे साहेब हे सापळापथकासह धारणी येथे बाल हनुमान मंदीराजवळ आले तेव्हा त्यांनी फोन करुन मला तेथे बोलावुन घेतल्याने मी माझ्या दुचाकी वाहनासह तेथे आलो. त्यावेळेस पोनि दंदे साहेब यांनी मला त्यांची ओळख सांगुन माझ्या तक्रारीबाबत थोडक्यात माहीती घेतली. त्यानंतर पोनी दंदे साहेब यांनी मला सरपंच पोउपनि विकास राठोड कडुन नोंदश्रीमती धांडे यांची भेट कशी होणार याबाबत विचारणा केली असता मी त्यांना, सरपंच श्रीमती धांडे हया सध्या ग्राम बोबदो येथील त्यांचे राहते घरी असल्याचे सांगितल्याने सरपंच श्रीमती धांडे यांची भेट घेण्याकरीता मला पाठवुन पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर लगेच स्टाफ शैलेश कडु यांनी माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्र. 1 श्री. राजु धारकर यांना माझ्या मोटरसायकलने सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांची भेट घेण्यासाठी ग्राम बोबदो येथील त्यांचे राहते घरी पाठविले तेव्हा माझी व सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांची भेट झाली भेटी दरम्यान सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांनी मला माझे ग्रा.पं.बोबदो अंतर्गत रोहणीखेडा येथे केलेल्या शौचालय दुरुस्तीचे कामाचे बिल देयकाचा चेक देण्याकरीता स्वताकरीता तडजोडी अंती 20,000 रु ची मागणी करुन सदर लाचेची रक्कम ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांचे कडे देण्याचे सांगितले व कोकाटे मॅडम या दिनांक 29/09/2022 रोजी सकाळी लवकर येणार असल्याचे सांगुन त्यांना भेटण्याचे सांगितले.

ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांची सकाळीच भेट घ्यावयाची असल्याने आपण आपल्या पथकासह धारणी येथे मुक्काम करणार असल्याचे सांगितल्याने मी सापळा पथकाची माझ्या राहते घरी आपल्या राहण्याची व्यवस्था केली. तेव्हा पोनी दंदे साहेब यांनी मला सापळापुर्व कारवाई उदया दिनांक 29/09/2022 रोजी करणार असल्याचे सांगुन सकाळी लाच रक्कम हजर करण्याचे सांगितले त्यावरुन दिनांक 29/02/2022 रोजी मी पोनी दंदे साहेब यांचेकडे 40,000 रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 80 नोटा होत्या असे हजर केले. त्या नोटांचे क्रमांक पोनि दंदे साहेब यांनी पंच क्र.2 यांना वाचण्यास सांगुन क्र.1 यांना कोऱ्या कागदावर लिहिण्यास लावले व त्यावर पंचांची व पोनि दंदे साहेब यांनी सहया केल्या.

त्यानंतर पोनि दंदे सोहब यांच्या सुचनेवरुन नापोका युवराज राठोड यांनी मी हजर केलेल्या नोटाला ॲन्थ्रीसीन पावरडर लावुन प्रात्यक्षीत करुन तसेच मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली. त्यानंतर मला ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम या कार्यालयामध्ये हजर आहे का याबाबत माहीती घेण्यात सांगितले असता मी माहीती घेतली असता ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम या त्यांच्या खाजगी कार्यालयामध्ये आल्याची माहीती समजली त्यावरुन ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांचे वर सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर पोनि दंदे साहेब यांचे सुचनेवरुन नापोका युवराज राठोड यांनी माझे पॅन्टच्या खिश्यात अॅथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम ठेवुन दिली व पोका शैलेश कडु यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझेजवळ देवुन मला पंच क्र.1 धारकर यांचे सह माझ्या दुचाकी वाहनाने रवाना केले. त्यानंतर आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांचे खाजगी कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. तेव्हा मी व पंच क्र.1 असे ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांचे खाजगी कार्यालयाच्या गेलो असता श्रीमती कोकाटे मॅडम या कार्यालयामध्ये हजर होत्या त्यावेळेस त्यांच्यात व माझ्यामध्ये माझे चेक संबंधाने बोलणे होयुन मला लाचेची मागणी केली असता मी माझे जवळ असलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांना दिली असता त्यांनी सदर लाचेची रक्कम उजव्या हाताने घेवुन त्यांच्या समोरील टेबलवर ठेवली

व मला अमरावती जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक अमरावती या बँकेचा 47,466 रु चा सरपंच व सचिव यांची सही असलेला चेक दिला त्यानंतर मी कार्यालयाच्या बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल असा लाच स्विकारण्याचा नियोजीत ईशारा केला त्यानंतर पोनि दंदे साहेब व सापळा पथक असे सर्वजन येवुन ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांना ताब्यात घेतले. त्यावेळी पोनि दंदे साहेब यांनी त्यांना त्यांचा पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी / कर्मचारी यांचा परिचय करुन दिला तेव्हा नापोका युवराज राठोड यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर पोनि दंदे साहेब यांनी ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांनी माझ्या कडुन स्विकारलेली लाच रक्कम जी त्यांचे समोरील टेबलवर ठेवली होती ती लाच रक्कम पंचासमक्ष जप्त केली. त्यानंतर पोनि दंदे साहेब यांनी सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांना ताब्यात घ्यायचे असल्याचे सांगुन ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम यांचे सह शासकीय वाहनाने ग्राम बोबदो येथे जावुन सरपंच श्रीमती धांडे मॅडम यांना घडलेली सर्व हकीकत सांगुन शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह येथे घेवुन आले व त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव आलोसे क्र 1.कु. शुभांगी बाळकृष्ण कोकाटे वय 43 वर्ष पद ग्रामसेवक ग्रा.पं. बोबदो, ह.मु.फ्लॅट क्र.101, गजानन रेसिडेंन्सी क्र.2 ता धारणी जि.अमरावती, मुळ पत्ता रा शेलवाडी पो. आंदुरा ता मुर्तीजापुर जि.अकोला वर्ग-3 आलोसे क्र. 2. सौ. सविता हरि धांडे वय 38 वर्ष, पद सरपंच ग्राम बोबदो ग्रा.पं.ता धारणी -जि अमरावती रा. बोबदो ता. धारणी जि. अमरावती असे सांगितले.

तरी मला माझे ग्रा.प.बोबदो अंतर्गत रोहणीखेडा येथे शौचालय दुरुस्तीचे कामाचा चेक काढण्यासाठी दिनांक 13/09/2022 रोजी बोबदो येथील ग्रामसेवक कोकाटे मॅडम यांनी स्वताकरीता 20,000 वा रु ची मागणी केली. तसेच सरपंच श्रीमती सवीता धांडे यांनी दिनांक 28/09/2022 रोजी माझे ग्रा.पं. बोबदो अंतर्गत रोहणीखेडा येथे केलेल्या शौचालय दुरुस्तीचे कामाचे देयकाचा चेक देण्याकरीता स्वताकरीता तडजोडी अंती 20,000 रु ची मागणी करुन सदर लाचेची रक्कम ग्रामसेवक कोकाटे मॅडम यांचे कडे देण्याचे सांगितले व दिनांक 29/09/2022 रोजी आलोसे कु.शुभांगी बाळकृष्ण कोकाटे ग्रामसेवक यांनी 16.32 वा ते 17.15 वा च्या सुनारास सापळा कार्यवाही दरम्यान सदर लाचेची रक्कम 40,000 रुपये त्यांचे खाजगी कार्यालय शिक्षक बँक कॉलनी धारणी येथे पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

surendra gopalrao belkhede(I (Inspector)) / DGPSGBM8105

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

4 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** surendra gopalrao b
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSGBM8105

स्टेशन डायरी अमलदार
पोलीस स्टेशन धारणी
जि.अमरावती ग्रामीण